# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, २ रा मजला, दक्षिण कक्ष, बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४.
दूरध्वनी : (०२२) २७५७१६७३, २७५७०१६६, २७५७१६७७.
मेल : estt6mjp@gmail.com


जा.क्र.मजीप्रा-२०२१/प्र.क्र.३३/आ-६ — दिनांक :- २५ /०९/२०२३.

**म.जी.प्रा.च्या आस्थापनेवरील सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) यांना उप अभियंता (स्थापत्य) या महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सरळसेवेच्या कोटयातील तदर्थ पदोन्नती.**

## कार्यालयीन आदेश

वाचा : पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र. मजीप्रा-११२२/प्र.क्र.२४/ पापु-२३, दिनांक १२.४.२०२३

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक १२ एप्रिल,२०२३ रोजीच्या पत्रान्वये सन २००४ ते २००७ या कालावधीत प्राधिकरणाने आयोगाच्या कक्षेतील पदांचे आयोगाकडे मागणीपत्र न पाठविता तदर्थ पदोन्नती पदे भरण्याची केलेली अनियमितता, सन २०१५ मध्ये आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारांना रुजू करुन घेताना निर्माण झालेल्या अडचणी, संबंधित अभियंत्यांनी त्यांना पदावनत न करण्यासाठी मा.उच्च न्यायालयात/सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली प्रकरणे, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशनंतरही प्राधिकरणाने संबंधित अभियंत्यांना पदावनत न करता सुरु ठेवलेली तदर्थ पदोन्नती या सर्व बाबी तसेच दिनांक २.२.२०२३ रोजी शासनाकडून आयोगाकडे पाठविलेले मागणीपत्र व पुढील दीड वर्षाच्या कालावधीत प्राधिकरणातील सेवानिवृत्त होणारे उप अभियंता विचारात घेऊन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नामनिर्देशनाच्या कोटयातील सहाय्यक कार्यकारी अभियंता व सहाय्यक अभियंता श्रेणी-१ गट-अ या संवर्गातील ३७ पदे (सध्या तदर्थ पदोन्नतीने कार्यरत असलेले अभियंते धरुन) सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) या संवर्गातील अभियंत्यांमधून तदर्थ पदोन्नतीने भरण्यास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता दिलेली आहे.

अ) आयोगाच्या कक्षेतील पदांवर ही तदर्थ पदोन्नती असून ही तदर्थ पदोन्नती केवळ ११ महिने किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून उमेदवार उपलब्ध होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल, तोपर्यंत असेल. आयोगाकडून उमेदवार उपलब्ध झाल्यानंतर सदर तदर्थ पदोन्नती आपोआप संपुष्टात येईल व यासंदर्भात संबंधित अभियंत्यांडून पदोन्नतीपूर्वी बंधपत्र प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांची राहील.

ब) या तदर्थ पदोन्नतीमुळे संबंधित अधिकाऱ्याला सेवाज्येष्ठतेचा कोणताही लाभ अनुज्ञेय नसेल.

क) तदर्थ पदोन्नती दिलेले काही अभियंते भविष्यात पदोन्नतीच्या नियमित कोटयात समायोजित होत असल्यास तदर्थ पदोन्नती द्यावयाच्या पदांची संख्या तेवढयाने कमी होईल.

२.  महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक बीसीसी-२०१७/ प्र.क्र.३१२ अ भाग-१/१६-ब, दिनांक २/११/२०१७ अन्वये असे कळविले आहे की, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक २७९७/२०१५ या प्रकरणी दिनांक ४/८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये, दिनांक २५/५/२००४ चा शासन निर्णय रद्द करुन पदोन्नतीमधील आरक्षण अवैध ठरविले आहे.

३.  मा.उच्च न्यायालयाने दिनांक ४/८/२०१७ च्या निर्णयास १२ आठवडयाची स्थगिती दिली होती. दिनांक १८/१०/२०१७ च्या पत्रान्वये सदर स्थगिती कालावधीत पदोन्नती आरक्षण देऊन पदोन्नतीचे आदेश निर्गमित करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले होते. हा स्थगिती कालावधी दिनांक २७/१०/२०१७ रोजी संपुष्टात आला आहे. या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या उक्त निर्णयास स्थगिती देण्याच्या अनुषंगाने, मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ दिनांक ३०/१०/२०१७ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक ४/८/२०१७ च्या निर्णयास कोणतीही स्थगिती दिलेली नाही. अथवा परिस्थिती "जैसे थे" ठेवण्याबाबत देखील कोणतेही आदेश दिलेले नाहीत. त्यामुळे शासन निर्णय दिनांक २५/५/२००४ मधील तरतुदीनुसार मागासवर्गीयांना पदोन्नतीमध्ये आरक्षण देता येणार नाही. यास्तव, मा.सर्वोच्च न्यायालयात दिनांक १३/११/२०१७ रोजी होणाऱ्या सुनावणीपर्यंत सर्व स्तरावरील पदोन्नती प्रक्रिया स्थगित ठेवण्यात यावी तसेच पदोन्नती संदर्भातील कोणतेही आदेश निर्गमित होणार नाही.

४.  त्यानंतर शासन पत्र क्रमांक बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२-अ/१६-ब, दिनांक २९/१२/२०१७ अन्वये तुर्तास पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरावयाची आहेत.

५.  राज्य शासनाने मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दिनांक ४/८/२०१७ च्या निर्णया विरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ वर अद्याप पर्यंत अंतिम निर्णय झालेला नाही. त्यामुळे सद्यस्थितीत पदोन्नतीच्या कोटयातील बिंदुनामावली तपासून शासन पत्र दिनांक २९/१२/२०१७ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार, केवळ खुल्या प्रवर्गातील पदे शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत भरणे अपेक्षित आहे.

६.  शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ७ मे, २०२१ अन्वये शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब , दिनांक २०/४/२०२१ हा अधिक्रमित करुन मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ या प्रकरणी दिनांक ४/८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दिनांक २५/५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेने भरण्यात यावीत, असे शासन निर्देश आहेत.

७. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवर महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नामनिर्देशनाच्या कोटयातील उप अभियंता (स्थापत्य) (सहाय्यक कार्यकारी अभियंता व सहाय्यक अभियंता श्रेणी-१ गट-अ) पदावर खालील विवरणपत्रातील सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) यांना संदर्भित पत्रामधील अटी व शर्तीच्या अधीन राहून तसेच शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, मुंबई दिनांक ७/५/२०२१ रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनानुसार, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ या प्रकरणी दिनांक ४/८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दिनांक २५/५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेनुसार भरावयाची आहेत. ही बाब विचारात घेऊन रुपये S-२० : ५६१००-१७७५००/- या वेतनश्रेणीत तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे. सदर तदर्थ पदोन्नत उप अभियंता (स्थापत्य) यांना नागरी सेवा मंडळाच्या शिफारशी तसेच सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने तदर्थ पदोन्नत उप अभियंता (स्थापत्य) यांना त्यांनी सादर केलेल्या बंधपत्राच्या अधीन राहून खालील तक्त्यातील रकाना क्र.५ मध्ये दर्शविल्यानुसार पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | ज्ये.सू. क्र. | सहा.अभियंता श्रेणी-२ (स्था) यांचे नांव | कार्यरत कार्यालयाचे नांव | पदोन्नतीनंतर पदस्थापनेच्या कार्यालयाचे नांव | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | ६७ अ | श्री.एस.एस.डिकळे | ग्रा.पा.पु.उपविभाग, कंधार, जि.प., नांदेड | ग्रा.पा.पु. उपविभाग, लोहा, जि.प., नांदेड | पा.पु. व स्व.वि. शा.नि. दि.२८/१२/२२ अन्वये नव निर्मित उपविभाग. |

८. वरील सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्याआस्थापनेवरील महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नामनिर्देशन कोटयातील उप अभियंता (स्थापत्य) (सहाय्यक कार्यकारी अभियंता व सहाय्यक अभियंता श्रेणी-१ गट-अ) या पदावर खालील अटी/शर्तीच्या अधीन राहून तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे.

१. वरील सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) यांना उप अभियंता (स्थापत्य) या पदावर देण्यात येत असलेल पदोन्नती शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, मुंबई यांचे शासन निर्णय दि. ७.५.२०२१ अनुसार, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ या प्रकरणी दिनांक ४/८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिकेच्या (विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७) अंतिम निर्णयाच्या अधिन राहून पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात दि.२५.५.२००४ च्या स्थितीनुसार सेवा ज्येष्ठतेच्या स्थितीनुसार केवळ पदोन्नती देण्यात येत आहे.

..३/

२. वरील सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) यांना त्यांनी लिहून दिलेल्या बंधपत्रानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नामनिर्देशन कोटयातील उप अभियंता (स्थापत्य) (सहाय्यक कार्यकारी अभियंता व सहाय्यक अभियंता श्रेणी-१ गट-अ) उप अभियंता (स्थापत्य) या पदावर दिलेली तदर्थ पदोन्नती असून ही तदर्थ पदोन्नती केवळ ११ महिने किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून उमेदवार उपलब्ध होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल, तोपर्यंत असेल. आयोगाकडून उमेदवार उपलब्ध झाल्यानंतर सदर तदर्थ पदोन्नती आपोआप संपुष्टात येईल.

३. या तदर्थ पदोन्नतीमुळे संबंधित अधिकाऱ्याला सेवाज्येष्ठताचा कोणताही लाभ अनुज्ञेय नसेल.

४. तदर्थ पदोन्नत उप अभियंता (स्थापत्य) यांच्या उप अभियंता (स्थापत्य) सवंर्गाच्या सेवाज्येष्ठतेमध्ये काही बदल उद्भवल्यास त्यानुसार, त्यांचे सेवाज्येष्ठतेमध्ये होणारा बदल नोंदवून आवश्यक ती अनुषंगिक पुढील कार्यवाही करण्यात येईल. परिणामी ज्येष्ठतेवर हक्क राहणार नाही.

५. सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) यांनी उप अभियंता (स्थापत्य) पदी दिलेली तदर्थ पदोन्नती स्वीकृत न केल्यास, महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेतन/ १९९९/ प्र.क्र.२/९९/ सेवा-३, दि.२०.७.२००१ अन्वये संबंधीतास सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने अंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणीचा म्हणजेच उप अभियंता पदाच्या वेतनश्रेणीचा लाभ दिला असेल तर सदर लाभ काढून घेण्यात येईल. या अनुषंगाने पदोन्नती स्वीकृत न करणारे सहाय्यक अभियंता श्रेणी-२ यांचे प्रकरणी संबंधीत कार्यालयाने उचित कार्यवाही करावी.

६. तदर्थ पदोन्नत उप अभियंता (स्थापत्य) यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी एक महिन्याच्या आत रुजू व्हावे. तसेच तदर्थ पदोन्नत उप अभियंता हे विहीत कालावधीत नेमणूकीच्या ठिकाणी रुजू झाले नाहीत. तर त्यांचे तदर्थ पदोन्नतीचे आदेश आपोआप रद्द होतील.

९. पदोन्नत अधिकाऱ्यांनी त्यांच्या नियुक्तीच्या ठिकाणी तात्काळ रुजू व्हावे, तसेच सदर पदाचा पदभार स्विकारल्यानंतर त्याचा अनुपालन अहवाल मध्यवर्ती कार्यालय/संबंधित मुख्य अभियंता कार्यालयास सादर करावा. पदोन्नत अधिकाऱ्यांनी अनधिकृत रजेवर जावू नये. त्यांचे लक्ष्य सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक सीडीआर-१०८२/२५६७/२८/अकरा, दिनांक ३०.८.१९८२ च्या परिपत्रकाकडे वेधण्यात येत आहे. त्यात दिलेल्या सुचना लक्षात घेऊन नियुक्ती रद्द करण्यासाठी कुठल्याही स्वरुपाची आवेदने सादर केल्यास, ते शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील याची नोंद घ्यावी.

१०. तदर्थ पदोन्नत उप अभियंता यांची पदस्थापना प्रशासकीय कारणास्तव असल्याने, त्यांना नियमानुसार पदग्रहण अवधी व प्रवासभत्ता अनुज्ञेय राहील.

(दिपाली देशपांडे सावेडकर)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

**प्रत : माहितीस्तव.**

- मा.मंत्री, पा.पु.व स्व. तथा म.जी.प्रा. अध्यक्ष यांचे खाजगी सचिव.
- प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मुंबई
- मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

**प्रत : माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.**

- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड
- संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
- मुख्य अभियंता, म.जी.प्रा. प्रादेशिक विभाग, औरंगाबाद.
- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुख्यालय, मुंबई/गुणवत्ता परिक्षण व दक्षता पथक, सिडको भवन / म.नि.स.स.कक्ष, मुंबई
- अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा. मंडळ, नांदेड
- कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा. विभाग, नांदेड
- कार्यकारी अभियंता, ग्रा.पा.पु.विभाग, जि.प., नांदेड
- व्यवस्थापक (स्था.मा.) तथा उप अभियंता (कक्ष-९), म.जी.प्रा., मध्यवर्ती कार्यालय, नवी मुंबई.
- उप अभियंता, आय.टी.सेल, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई.
- कक्ष अधिकारी, आस्था-१ (उविअ)/ आस्था-२ (विचौ), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई.
- तदर्थ पदोन्नत उप अभियंता (स्थापत्य)
- कार्यालयीन आदेश धारिका.